संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# तुटीचा आणि त्रुटींचा अर्थसंकल्प

**राज्य सरकारच्या** अर्थसंकल्पामध्ये असलेली प्रचंड तूट हा अतिशय चिंताजनक मुद्दा ठरतो. निवडणुकीच्या तोंडावर केलेली एक राजकीय कसरत म्हणूनच त्याकडे पाहावे लागते. अन्यथा जर निवडणुक नसती तर हाच अर्थसंकल्प अधिक सकारात्मक राहू शकला असता. ही तूट भरून काढण्याचे तसे कोणतेही ठोस उपाय सुचविता आलेले नाहीत हे त्यातले सर्वात मोठे शल्य ठरते. देशाची आर्थिक राजधानी ज्या महाराष्ट्रात आहे किंवा सर्वाधिक आयकर हा एकट्या मुंबईतून केंद्र सरकारला पुरविला जातो ते महाराष्ट्र राज्य आर्थिकदृष्ट्या डबघाईत असावे ह्याच्या इतके दुसरे दुर्दैव नाही. तब्बल वीस हजार कोटींची महसूली तूट हे काही योग्य लक्षण ठरत नाही. एकीकडे सरकारने वस्तुसेवा कराच्या महसूलात वाढ झाल्याचा दावा केला आणि तरीसुद्धा वीस हजार कोटीची तूट राहावी हा प्रकार रहस्यमय वाटू शकतो. त्यातला विशेष मुद्दा असा आहे की, राज्यातील पायाभूत सुविधांसाठी जी भरीव तरतूद अपेक्षित होती ती अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. सरकारने वेगवान वाहतुकीसाठी १४,४५५ कोटीची तरतूद केलेली आहे. तर मुंबई-नागपूर समृद्धी मार्गासाठी ५,००० कोटी रुपये भूसंपादनासाठी दिले आहेत. त्याबरोबरच शेती, शिक्षण व रोजगारावर सरकारने भरीव तरतूद केल्याचा दावा केला जात आहे. परंतू रोजगार निर्मितीसाठी अर्थसंकल्पात कोणतेही ठोस आश्वासन नाही. मुळातच राज्य सरकार कर्जाच्या गर्तेत बुडालेले आहे. अशा सरकारकडून शिलकीतला अर्थसंकल्प सादर होईल अशी अपेक्षाही ठेवता येत नाही. गेल्या वर्षी ५ लाख कोटींचे कर्ज डोक्यावर असताना आणखीन ५०,००० कोटींचे कर्ज घ्यावे लागणार होते. परंतु सरकारने ते १०,००० कोटींपर्यंतच रोखून धरले आणि ही गोष्ट अर्थमंत्र्यांना फार मोठ्या फुशारकीची वाटलेली आहे. खरेतर हे कर्जसुद्धा काढण्याची वेळ येता कामा नये. अर्थात कर्जाचा हा बोजा गेल्या वीस वर्षांपासून राज्याच्या डोक्यावर आहे. त्यापैकी किमान पाच टक्के कर्ज तरी फेडण्याचे कर्तृत्व या सरकारने दाखवायला हवे होते. अर्थशास्त्राच्या भाषेतच बोलायचे तर सरकारचे भांडवली उत्पन्न वाढलेले नाही. महसूली उत्पन्नही वाढलेले नाही आणि डोक्यावरचे कर्जही कमी झालेले नाही. अशावेळी ऋण काढून विकासाचा सण साजरा करणारा हा प्रकार 'अव्यापारेषु व्यापारा'सारखा वाटू लागतो. मुंबईसारखी कुबेर नगरी राज्याकडे आहे, असे म्हटल्यावर कल्पक योजनांच्या माध्यमातून सरकारला हे उत्पन्न निश्चितच वाढविता येऊ शकते. केंद्रसरकार दरवर्षी या महानगरीतून अधिकाधिक आयकर गोळा करते. तर महाराष्ट्राला स्वतःचे उत्पन्न वाढविता का येऊ नये?

## कृषीक्षेत्राची भलावण

सरकारने या अर्थसंकल्पात शेतीसाठी ९,००० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तर सिंचनासाठी ८,००० कोटींची तरतूद केली आहे. गेल्यावर्षीदेखील अशाच प्रकारची भरघोस तरतूद केली गेली. तरीदेखील ना शेतकरी समाधानी दिसला, ना राज्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढू शकले. जल शिवार योजनेचा बराच प्रचार-प्रसार झाला. तरीदेखील त्या योजना दुष्काळात उपयोगी पडू शकलेल्या नाहीत. आतादेखील शेतकऱ्यांसाठी आदिवासी आणि अनुसूचित जाती जमातींसाठी भरघोस तरतूद केल्याचे अर्थसंकाल्पात दिसून येते. ही केवळ निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून केलेली मखलाशी म्हणावी लागेल. आपल्या राजकीय स्वार्थासाठी राज्यकर्ते अर्थसंकल्पाचाही वापर करून घेत असतात. त्याचेच हेदेखील उदाहरण आहे. आश्चर्याची गोष्ट अशी असते की, गेल्यावर्षी तरतूद केलेल्या रकमेचा १०० टक्के वापर झालेला नसताना यावर्षीच्या अर्थसंकल्पात त्याच कारणांसाठी ज्यादा रकमेची तरतूद करण्याचे कारण लक्षात येत नाही. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी पैसा नसल्याचे सरकार सांगते. पण अर्थसंकल्पात तरतूद करताना आम्ही शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक पैसा राखून ठेवल्याचे सरकारकडून सांगितले जाते. तेव्हा यात विरोधाभासही लक्षात येते. राज्याच्या कृषीक्षेत्राचा विचार करताना त्या क्षेत्रावर आधारित असलेल्या रोजगाराचाही विचार होणे क्रमप्राप्त ठरते. दुर्दैवाने कृषीआधारित रोजगाराला प्रोत्साहन देण्याचा कोणताही प्रयत्न दिसून येत नाही. या आकडेवारीवरून अर्थसंकल्पातला ४०% भाग हा कृषी आणि आदिवासी क्षेत्राशी निगडित असल्याचे दिसते. त्यातून या क्षेत्राला निश्चितपणे न्याय मिळेल की नाही हे सांगता येणार नाही.

## अर्थसंकल्पाचे स्वरुपच बदला

अर्थसंकल्पातून सरकारकडे भरपूर पैसा असल्याचे दिसून येते. परंतू त्याच्या पूर्ण विनियोगाचे धोरण शोधावे लागते. अर्थसंकल्पांमध्ये ज्या ज्या कारणांसाठी पैसा राखून ठेवला जातो तो त्याच कामांसाठी पूर्णपणे वापरला जात नाही. अशावेळी हे अर्थसंकल्पाच्या मूळ उद्देशांविषयी फारकत घेतल्यासारखे दिसून येते. नेहमीच्या पठडीतला अर्थसंकल्प सादर करणे आणि आकडेवारीचा खेळ करून राज्याच्या अर्थव्यवस्थेची भलामण करणे हा आता काही नवीन प्रकार राहिलेला नाही. यापेक्षा गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पाबरोबर यावर्षीच्या अर्थसंकल्पाची तुलना करून सरकारने कोणकोणत्या क्षेत्रात किती प्रमाणात निधी वापरला हे जर दाखवून दिले तर राज्याचा कसा आणि कोणत्या क्षेत्रात विकास होत आहे. कोणते क्षेत्र वंचित राहत आहे हे अधिक स्पष्ट होऊ शकेल. परंतु अर्थसंकल्पाचा कधीही पंचनामा केला जात नाही. केवळ नव्या घोषणा आणि नव्या रकमांचे मोठे आकडे जाहीर करून लोकांची दिशाभूलच होत राहते. हा प्रकार थांबला पाहिजे. सध्याचे अर्थसंकल्पांचे स्वरूप किंवा ते सादर करण्याची पद्धत बदलण्याची गरज आहे. कारण केलेले संकल्प सिद्ध करणे म्हणजेच प्रत्यक्षात आणणे हेच सर्वात मोठे आव्हान असते. परंतु हे आव्हान स्वीकारताना राज्यकर्त्यांनी भंबेरी उडण्याची शक्यता असल्याने ते या भानगडीत पडतच नाहीत. तोकड्या आकड्यांचा संकल्प करून स्वतःचे समाधान करून घेतले जाते. आज महाराष्ट्राला रोजगाराचा प्रश्न सर्वाधिक भेडसावतो आहे. सरकारने ७०,००० हजार जागांची भरती करण्याची घोषणा केली होती. या जागा भरताना आवश्यक त्या रकमेची तरतूद अर्थसंकल्पात दिसत नाही. एवढेच नव्हे तर स्वयं रोजगारासाठी आवश्यक असलेल्या रकमेमध्ये कोणतीही मोठी वाढ केलेली नाही. या सर्व बाबी लक्षात तर हा अर्थसंकल्प तुटीचा आहेच पण अनेक त्रुटींचाही ठरतो.